# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ/फॅक्स

**क्र.** रानिआ/मनपा२००५/प्र.क्र.२६/का.०५
**नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :-** २९ ऑगस्ट, २००५

प्रति,
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका

विषयः- महानगरपालिका पोटनिवडणूक- ऑक्टोबर-२००५

नागपूर महानगरपालिकेतील खालील नमूद पद रिक्त झाल्याच्या सूचना राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाली आहे.

| अ.क्र | महानगरपालिकेचे नांव | प्रभाग क्र. | सदस्याचे नाव | पद रिक्त होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | नागपूर | ४अ | श्री.बिरजूराम सपुरन कोसरे | जात प्रमाणपत्र अवैध |

उपरोक्त रिक्त पदाची पोट निवडणूक घेण्याकरीता परिशिष्ट-१ मध्ये दर्शविल्यानुसार कार्यक्रम देण्यात येत आहे.

२. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या कलम १२ अन्वये राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी महानगरपालिकेच्या प्रभागानुसार विभागून ती पोटनिवडणूकीसाठी छापून घेणे व अधिकाऱ्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. या प्रयोजनासाठी दिनांक ९/९/२००५ ही तारीख अधिसूचित करण्यात येत आहे. या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी संबंधित प्रभागामंध्ये विभागून प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करावयाच्या आहेत. सदर तारीख अधिसूचित करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने काढलेला समक्रमांकाचा दिनांक २४/८/२००५ आदेश या सोबत जोडला आहे.

३. प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित प्रभागातील मतदारांच्या माहितीसाठी दिनांक १२/९/२००५ रोजी मतदार याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात. विधानसभा मतदार यादीवरुन महानगरपालिका प्रभागाची मतदार यादी तयार करताना काही चुका राहिल्या असतील, तर त्यासंदर्भात दिनांक १४/९/२००५ पर्यन्त संबंधितांकडून हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेवून अधिसूचीत केलेल्या तारखेस विधान सभा मतदार याद्यांवरुन महानगरपालिकेच्या निवडणूकांकरीता मतदार याद्या तयार करताना १) काही लेखनिकांच्या चूका असल्यास त्या सुधारण्यात याव्यात. २) दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील

तर त्यांची नांवे त्या प्रभागातून वगळण्यात यावी व संबंधित प्रभागात समाविष्ट करण्यात यावी. ३) महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभा यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या मतदार यादीमध्ये त्यांची नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नांवे मतदार यादीत समाविष्ट करण्यात यावीत. त्यानंतर दि.१७/९/२००५ रोजी मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यात याव्यात व त्याबाबतची सूचनाही प्रसिध्द करण्यात यावी. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र. एसईसी/१०९६/ प्र.क्र.६/९६/का-३, दि.३१/१/१९९६ अन्वये दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. या निवडणूकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्यात येईल.

५. संबंधित विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांना पितळी सील कृपया वेळेत पुरवावेत.

६. हे पत्र निर्गमित होण्याच्या तारखेपासून संबंधित महानगरपालिकांच्या क्षेत्रात निवडणूक आचारसंहिता लागू होईल. याबाबत आयोगाचे आदेश क्र. स्थास्वसं ११०३/प्र.क्र.३२/का-०५, दि. २९/३/२००४ यांचे तंतोतंत पालन होईल, याची कृपया दक्षता घेण्यात यावी आणि जर आचारसंहितेचा भंग होत असेल तर कायदेशीर कारवाई तात्काळ करावी. पोटनिवडणूकीची आचारसंहिता निकाल जाहीर होईपर्यन्त अस्तित्वात राहिल. या कालावधीत मतदारांवर प्रभाव पडेल, असा कोणताही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यास राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेण्यात यावी. यामध्ये निवडणूकी संबंधी अधिकारी/ कर्मचारी यांच्या बदल्याचाही समावेश होतो. मात्र सध्या सुरु असलेली कामे न थांबविता पूर्ण करण्यात यावीत. या संदर्भात कोणतीही शंका असल्यास संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांच्या अभिप्रायासह राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा करण्यात यावी.

**७. महानगरपालिका क्षेत्रातील पूरपरिस्थिती व साथीचे रोग यांच्यावर उपाययोजना करणे इत्यादी संदर्भातील कोणत्याही कामकाजास आचारसंहितेची बाधा असणार नाही. मात्र या संदर्भात संबंधित प्रभागात होणाऱ्या कार्यक्रमात मंत्री, खासदार, आमदार व इतर नगर सेवक व पदाधिकारी यांचा सहभाग राहणार नाही, याची काळजी घ्यावी.**

८. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.२९/का-१०, दि. १२/७/२००१ अन्वये विहित केलेले उमेदवारांना दोनपेक्षा अधिक अपत्ये नसल्याबाबत शपथपत्र तसेच आदेश क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/का.०५, दि. १५/३/२००४ अन्वये उमेदवारांकडे अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींकडे किती संपत्ती आहे व उमेदवारांवर कुठलाही अपराध केल्याचा आरोप आहे काय, त्याची शैक्षणिक

पात्रता काय आहे इत्यादीबाबतची शपथपत्रे विहित नमुन्यांत करणे बंधनकारक आहे. सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना ही शपथपत्रे नामनिर्देशनपत्रासोबत घेण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. तसेच, शपथपत्रांचे नमुने नामनिर्देशनपत्रासोबत संबंधितांना उपलब्ध करण्यात यावेत. निवडणुकीच्यावेळी एखादया प्रभागात एकच उमेदवार शिल्लक राहिल्यास राज्य निवडणुक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००४/प्र. क्र. ३७/का.५, दिनांक २३ डिसेंबर २००४ प्रमाणे कार्यवाही करावी.

९. आयुक्त, महानगरपालिका यांनी अधिनियम व नियमांच्या संबंधित तरतुदीनुंसार निवडणूक कार्यक्रम घोषित करावा. निवडणुका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडाव्या, यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. या पोटनिवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने दिल्याप्रमाणे पार पाडावेत व प्रत्येक टप्पा पार पडल्यानंतर त्याबाबतची सूचना तसेच आयुक्त, महानगरपालिका आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरीता सूचना पुस्तिका ऑगस्ट, २००३ मधील पृष्ठ क्र. ३१३ ते ३२५ येथे दर्शविलेल्या नमुन्यांमधील माहिती राज्य निवडणूक आयोगाला दूरध्वनी क्रमांक २२८८६९५० / २२०४५०७५ / २२०४५५८९ तसेच फॅक्स क्रमांक २२८४६७१९ / २२८४६७२१ / २२०४६९०९ वर वेळोवेळी राज्य निवडणूक आयोगास द्यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(चाँद गोयल )
प्रधान सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रतः-
१. महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, संबंधित पोलिस आयुक्त यांना आवश्यकतेनुसार पोलिस दल जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात.
३. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग
५. जिल्हाधिकारी, नागपूर
६. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. पोलिस आयुक्त, नागपूर
८. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
९. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई
१०. निवड नस्ती (कार्यासन-०५) राज्य निवडणूक आयोग, मुंबई

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या
## अंतर्गत महानगरपालिकेच्या प्रभागांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम

| अ.क्र | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| | **मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक** | **०९/०९/२००५ (शुक्रवार)** |
| १. | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन महानगरपालिका निवडणूकांकरिता प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १२/०९/२००५ (सोमवार ) |
| २. | मतदार यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | १४/९/२००५ (बुधवार) |
| ३. | राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-एसईसी/१०९६/प्र.क्र.६/९६/का-३, दिनांक ३१/१/९६ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार प्रभागाच्या छापील मतदार याद्या अधिनियमाच्या कलम १२ खाली अधिप्रमाणित करण्याचा व प्रसिध्दीबाबत सूचना देण्याचा दिनांक | १७/०९/२००५ (शनिवार ) |
| ४. | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रम शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | १७/०९/२००५ (शनिवार) |
| ५. | नामनिर्देशनपत्रे देणे | १७/०९/२००५ (शनिवार) ते २३/०९/२००५ (शुक्रवार)<br>(सकाळी ११.०० ते दुपारी ३.००)<br>**तसेच**<br>दि. २४/०९/२००५ (शनिवार) रोजी<br>सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत नामनिर्देशनपत्रे देण्यात येतील.<br>(रविवार, दि.१८/०९/२००५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत) |
| ६. | नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी | १७/०९/२००५ (शनिवार) ते २४/०९/२००५ (शनिवार)<br>(सकाळी ११.०० ते दुपारी ३.००)<br>(रविवार, दि.१८/०९/२००५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत) |

| | | |
|---|---|---|
| ७. | नामनिर्देशनपत्रांची छाननी | २६/०९/२००५ (सोमवार)<br>(सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ८. | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०४/१०/२००५ (मंगळवार) |
| ९. | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ०५/१०/२००५ (बुधवार)<br>(सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यन्त ) |
| १०. | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | ०७/१०/२००५ (शुक्रवार)<br>(सकाळी ११.०० पासून) |
| ११अ. | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी शासनराजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०८/१०/२००५ (शनिवार ) |
| ११ब. | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | ०८/१०/२००५ (शनिवार ) |
| ११ . | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेलया अधिकाऱ्याने मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | ०८/१०/२००५ (शनिवार ) |
| १२. | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २३/१०/२००५ (रविवार)<br>(सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यन्त) |
| १३. | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २४/१०/२००५ (सोमवार)<br>(सकाळी ९.०० पासून ) |
| १४. | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | २८/१०/२००५ (शुक्रवार) रोजी किंवा तत्पूर्वी |

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र